Please Consider the Environment Before Printing…

**Date: 28/02/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष



## मराठी ग्रंथकार डॉ. शंकर दामोदर पेंडसे

शंकर दामोदर पेंडसे हे मराठी ग्रंथकार आणि संतसाहित्याचे गाढे अभ्यासक होते. त्यांचा जन्म २८ फेब्रुवारी १८९७ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील खेड या गावी झाला. दिल्लीच्या हिंदू कॉलेजातून ते बी.ए. झाले (१९२३). लाहोरच्या सनातन धर्म कॉलेजातून एम.ए. आणि एम.ओ.एल. या संस्कृत व प्राच्यविद्या या विषयांतील सर्वोच्च पदव्या त्यांनी मिळविल्या. १९२७ मध्ये नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजात मराठीचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. पुढे १९३० मध्ये नागपूर विद्यापीठाची एम. ए. परीक्षा मराठी हा विषय घेऊन ते प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्या वर्षीचे मराठीचे ना. के. बेहेरे सुवर्णपदक मिळविण्याचा मान त्यांनी मिळवला. श्री ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान हा प्रबंध लिहून त्यांनी १९३९ मध्ये नागपूर विद्यापीठाची पीएच. डी. मिळविली. निवृत्त होईपर्यंत त्यांनी हिस्लॉप कॉलेजमध्येच मराठीचे प्रमुख म्हणून काम केले.

ज्ञानेश्वरीचा अभ्यास (१९५४), मराठी संत-काव्य आणि कर्मयोग (१९६१), ज्ञानदेव-नामदेव (१९६९), भागवतोत्तम संत एकनाथ (१९७१), साक्षात्कारी संत तुकाराम (१९७२), राजगुरु समर्थ रामदास (१९७४) या त्यांनी लिहिलेल्या संतवाङ्मयविवेचक ग्रंथांतूनही त्यांची विद्वत्ता, त्यांचा व्यासंग आणि त्यांची रसिकता यांचे दर्शन घडते. यांनी लिहिलेले पौराणिक भागवत धर्म (१९६७) हे पुस्तक उल्लेखनीय आहे. याशिवाय त्यांचे स्फुट लेखनही बरेच आहे. त्यात 'कर्मयोग की कर्मसंन्यास', 'टिळकांची धर्मविषयक मते', 'शिवकालीन संस्कृती व धर्म', 'मराठी राजकारणाचा आत्मा', 'विद्यापीठे व मातृभाषा' इ. लेखांचा समावेश होतो. १९५३ मध्ये मोझरी येथे भरलेल्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. १९५५ मध्ये पंढरपूर येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. शंकर पेंडसे यांचे २३ ऑगस्ट १९७४ रोजी पुणे येथे निधन झाले.

Nashik Edition
Feb 28, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401